**महाराष्ट्र लोकसेवा आयोग** (दि. 17 मार्च, 2018)

**विषय:- उमेदवारांच्या मागण्या व डमी उमेदवारांबाबत वस्तुस्थिती.**

**शासकीय पदांवरील नेमणुकीसाठी होणा-या निवड प्रक्रियेत डमी उमेदवार बसवून गैरप्रकार होत असल्याच्या बातम्या प्रसिध्दी माध्यमातुन अलीकडे येत आहेत. यामधील बहूतांश निवड प्रक्रियांशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा संबंध नसला तरी, याबाबत "MPSC घोटाळा" किंवा "MPSC Scam" अशा शिर्षकाने प्रसिध्दी दिली जात असल्याने सर्व सामान्यांची व उमेदवारांची दिशाभूल होवून आयोगाबाबत चुकीचे चित्र निर्माण होत आहे. त्याचबरोबर MPSC च्या परीक्षेच्या उमेदवारांकडून विविध मागण्याही केल्या जात आहे. यातील काही मागण्यांचा आयोगाशी संबंध नाही तर काहींचा आयोगाशी संबंध आहे. याबाबतची वस्तुस्थिती तसेच आयोगामार्फत केलेली/ केली जात असलेली कार्यवाही उमेदवारांच्या माहितीकरिता खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी आयोगाच्या परीक्षेत गैरप्रकार करणा-यांवर जास्तीत जास्त कठोर कारवाई केली जाईल याची उमेदवारांनी खात्री बाळगावी.**

**मागणी:- राज्य सेवा परीक्षेच्या पदसंख्येत वाढ करावी. 30% पदकपात रद्द करावी.**
**वस्तुस्थिती:-** ही शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. पदभरतीकरिता मागणीपत्रे पाठविणे, पदसंख्येत वाढ/कपात, भरावयाच्या पदांचे आरक्षण हे **विषय शासनाचे अखत्यारीतील** आहेत. आयोगाच्या कार्यकक्षेतील नाहीत.

**मागणी:- PSI/STI/ASO करिता संयुक्त स्पर्धा परीक्षा रद्द करुन स्वतंत्र परीक्षा घ्याव्यात.**
**वस्तुस्थिती:-** पूर्वी या पदांसाठी संयुक्त परीक्षा होत असे. PSI पदभरतीसंबंधातील न्यायालयीन प्रकरणांतील विलंबामुळे मध्यंतरी स्वतंत्र पुर्व परीक्षा सुरु झाली. उमेदवारांचे वेळेतील व खर्चातील बचत, परीक्षेचे वेळापत्रकाची अंमलबजावणी अशा **विविध बाबींचा साकल्याने विचार करुनच** गतवर्षी आयोगाने संयुक्त पूर्व परीक्षेचा **निर्णय घेतला**. या तिनही पदांच्या पुर्व परीक्षांचा अभ्यासक्रम व परीक्षायोजना एकच आहे. **संयुक्त पुर्व परीक्षा उमेदवारांच्या हिताचीच आहे.** पुर्व परीक्षेचा निकाल संवर्गनिहाय स्वतंत्र लावला जातो. मुख्य परीक्षासुद्धा स्वतंत्र घेतली जाते.

**मागणी:- आयोगाने बायो-मॅट्रीक पद्धतीने हजेरी घ्यावी. उमेदवारांची 3-4 वेळा तपासणी करावी.**
**वस्तुस्थिती:-** बायो-मॅट्रीक हजेरीच्या उद्देशानेच एप्रिल, 2016 मध्ये घोषणा करुन उमेदवारांना आधार कार्ड त्वरित काढण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. मार्च, 2017 पासून ऑनलाईन अर्जप्रणालीत आधारकार्डाचा तपशिल नोंदविण्याची सोय केली. आतापर्यंत सुमारे सात लाख उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये आधारकार्डाचा तपशिल नोंदविला आहे. त्यातील **चुका तातडीने दुरुस्त करण्याबाबत आयोगाने दि. 12.02.2018 रोजीच्या घोषणेद्वारे उमेदवारांना पुन्हा अंतिम मुदत दिलेली आहे.** दि. 11.03.2018 रोजी लघुलेखक परीक्षेत नेहमीच्या हजेरी व्यतिरिक्त बायो-मॅट्रीक हजेरीची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यासाठी उमेदवारांना परीक्षेच्या वेळेपूर्वी अर्धा तास ऐवजी दीड तास अगोदर बोलाविले होते.

**मागणी:- परीक्षाकेंद्रांवर मोबाईल-जॅमरचा वापर करावा.**
**वस्तुस्थिती:-** मोबाईल-जॅमरचा प्रयोग आयोगाने सप्टेंबर, 2016 मध्ये केला. त्यानंतर सात **महत्त्वाच्या परीक्षांमध्ये मोबाईल-जॅमरचा वापर केला आहे**. पुढेही योग्य तो कार्यवाही केली जाईल.

**मागणी:-उत्तरपत्रिकेवर बारकोडचा वापर करावा.**
**वस्तुस्थिती:-** गेल्या **अनेक वर्षांपासून** आयोगाच्या परीक्षांत **उत्तरपत्रिकांवर बारकोडचा वापर केला जात आहे.**

**मागणी:- सर्व निवडप्रक्रियांमध्ये प्रतिक्षा यादी लावावी.**
**वस्तुस्थिती:-** काही **मोजक्या बहुसंवर्गीय निवडप्रक्रियांचा अपवाद वगळता** (राज्य सेवा, अभियांत्रिकी सेवा) **उर्वरित सर्व निवडप्रक्रियांत गुणवत्तायादीचा वापर प्रतिक्षा यादी म्हणून केला जातो.** राज्य सेवेसारख्या बहुपर्यायी निवडप्रक्रियेत प्रतिक्षा यादीचा वापर व्यवहार्य होत नाही. एखाद्या बदलांमुळेसुद्धा अनेक संवर्गातील शिफारशींमध्ये बदल होतात, संवर्ग बदलतात, ज्येष्ठता बदलते. ज्येष्ठता व पदोन्नतीबाबतचे वाद व न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. स्पर्धा परीक्षा, विभागीय परीक्षा व सरळ सेवा परीक्षांचा एकत्रित विचार करता, सुमारे 98% निवडप्रक्रियांमध्ये गुणवत्तायादी ही प्रतिक्षा यादी म्हणून वापरली जाते. आयोगाच्या संकेतस्थळावर ती प्रसिद्धही केली जाते.

**मागणी:- परीक्षांत गैरप्रकार करणा-या उमेदवारांना काळया यादीत टाकणे.**
**वस्तुस्थिती:-** आयोगाच्या परीक्षांत मोबाईलचा वापर करणे, कॉपीचा प्रयत्न करणे, तोतयेगिरीचा प्रयत्न अशा **गैरप्रकारांसाठी उमेदवारांस** कारणे दाखवा नोटीस बजावून व **बाजू मांडण्याची संधी देवून** नंतर **काळया यादीत टाकले जाते**. दोषी उमेदवारांना आयोगाच्या सर्व परीक्षांना बसण्यापासून काही वर्षांसाठी किंवा कायमस्वरुपी प्रतिरोधित केले जाते. **काळी यादी** आयोगाच्या **संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचाही निर्णय घेतला आहे.**

**मागणी:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने तामिळनाडू पॅटर्न राबवावा.**
**वस्तुस्थिती:-** उमेदवारांची ही मागणी स्पष्ट नाही. स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक, परीक्षा दिनांक, मुलाखत दिनांक, निकालाचा दिनांक, शिफारस दिनांक, नेमणुक दिनांक आगाऊरीत्या जाहीर करण्यासंबंधातील तामिळनाडू **पॅटर्न व्यवहार्य नसल्याने, तामिळनाडू आयोगाने नंतर तो बंद केल्याचे निदर्शनास आले आहे.**

**मागणी:- UPSC च्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सी-सॅट पेपर केवळ पात्रतेसाठी ग्राहय धरावा.**
**वस्तुस्थिती:-** याबाबत कधी **ग्रामीण** भागातील उमेदवारांवर अन्याय होत आहे, तर कधी **कला व वाणिज्य शाखेतील उमेदवारांवर अन्याय होतो अशी कारणे दिली जातात.** तथापि, त्यात **तथ्य आढळलेले नाही.** राज्य सेवेच्या पुर्व परीक्षेतील दुस-या पेपरमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य केल्यास पहिल्या पेपरमध्ये उत्कृष्ट गुण मिळवणारे उमेदवारही स्पर्धेतून बाद होतील. शासनातील महत्त्वाच्या राजपत्रित पदांसाठी उमेदवारांची आकलनशक्ती, समज, विश्लेषण, आकलनाचा वेग, सुक्ष्म निरीक्षणे इ. गुणांचे परीक्षण होणे आवश्यकच आहे.

**मागणी:- स्पर्धा परीक्षेतील डमी उमेदवारांवर कारवाई करावी.**
**वस्तुस्थिती:-** सी.आय.डी. औरंगाबाद यांचेकडून प्राप्त पोलीस अहवालानुसार डमी उमेदवार बसवून यशस्वी / निवड झालेले बहुतांश (15 **पैकी** 14) **उमदेवार हे जिल्हास्तरीय निवडप्रक्रियेतील असून आयोगाच्या परीक्षेशी संबंधित नाहीत.** अटक झालेल्या 15 उमेदवारांपैकी **एक उमेदवार** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या **लिपिक-टंकलेखक परीक्षेशी संबंधित** आहे. डमी उमेदवार प्रकरणातील दोषींवर; त्याला काळया यादीत टाकणे, आयोगाच्या सर्व परीक्षांपासून प्रतिरोधित करणे, शिफारस झाली असल्यास रद्द करणे, अशी कडक कारवाई केली जाईल. तसेच त्याच्या निलंबनाबाबत शासन विभागास कळविले जाईल. पोलीस तपासणीतील अंतिम निष्कर्ष व कागदोपत्री पूरावे प्राप्त होताच दोष सिध्दीप्रमाणे शिफारस रद्द करण्याची कारवाईही केली जाईल. व शासनास नेमणूक रद्द करण्यासाठी कळविले जातील. अशा प्रकरणांमध्ये **दोषी उमेदवारांवर कठोर कारवाई करण्याची आयोगाची भुमिका आहे.**

**मागणी:- परीक्षेतील प्रश्न रद्द केल्यास किंवा उत्तराचा पर्याय बदलल्यास आयोगाने संदर्भासह स्पष्टीकरण द्यावे.**
**वस्तुस्थिती:-** या विषयातील गोपनीयता, संवेदनशीलता व व्यवहार्यता तपासून निर्णय घेण्यात येईल.

**मागणी:- राज्य व जिल्हापातळीवरील रिक्त जागा आयोगाने भराव्यात.**
**वस्तुस्थिती:-** ही मागणी शासनाशी संबंधित आहे.

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**